सरकारचे अभीष्ट चिंतन करावे अशी अपेक्षा असतेच. दुसऱ्या सहाय म्हणायचे म्हणजे ती सुद्धा एक प्रकारची इनाम धारकांनी नोकरीच करायची असे होते. तेव्हा नोकरी इनामाचे नियम सर्वांना इनामास लावले गेले हे सुसंगतच होय. या हुकमांचा दुसरा परिणाम असा की वतनी कायद्याप्रमाणे दुसऱ्या मुली वारस ठरल्या असत्या, पण या वटहुकमाप्रमाणे वारसा फक्त पुरुष संततीकडेच जायला हवा हे तत्व स्पष्ट मांडले गेले.

## इनामदाराचे हयातीपर्यंतच सत्व

या वटहुकमानी व या कालात झालेल्या आणखी काही वटहुकमानी आणखी एक तत्व प्रस्थापित केले की इनाम मिळखत ही मूलतः सरकारच्याच मालकीची. इनामधारक हा केवळ त्याचा वहिवाटदार आणि त्याचे सत्व ( interest ) त्याचे हयातीपर्यंतचे फक्त. म्हणून त्याने केलेले लागणीचे करारसुद्धा भावी वारसावर बंधनकारक मानले जाणार नाहीत असे ठरविले. म्हणजे पूर्वीच्या हिंदू लॉ प्रमाणे विधवेस जे अधिकार होते तेवढेहि इनामदाराना राहिले नाहीत. कारण कायदेशीर गरजेसाठी विधवेस तबदिली करता येत असे, तेवढीहि मुभा इनामदारास राहिली नाही.

## वारसा हक्कावरील नियंत्रण

वट नं. ४४/१९१३ ने वडील घराण्याचे वडील मुलासच वारसा जाणेचा म्हणजे Rule of Primogeniture प्रस्थापित केला. हा नियम वतनी जमिनीसहि अर्थात् लागू झाला म्हणजे वतन ॲक्टच्या तरतुदीपेक्षा हे नियंत्रण अधिक कडक झाले. या योगे नवऱ्याची विधवा स्त्री सोडली तर दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीस इनाम मिळखतीचा वारसा जावयाचा नाही हे धोरण ठरविण्यात आले हे स्पष्ट होईल.

वारसा हक्कावरील दुसरी मर्यादा 'नष्टांश' या शब्दाचे मर्यादित अर्थाने पडली. सरळ पुरुष संतति म्हणजे मुलगा, नातू व पणतू आणि विधवा असे कोणी वारस नसले की त्याचा नष्टांश झाला असे समजून तो वारसा हिंदू लॉ प्रमाणे दुसऱ्या जवळच्या वारसाकडे न जाता घराण्यातील लगतच्या खुतातील श्रेष्टाधिकारी यास जावयास हवा असे ठरविण्यात आले. मात्र पोटभाऊबंदाचा नष्टांश झाल्यास ते उत्पन्न नाववाला श्रेष्टाधिकारी यांचेकडे जावे वगैरे ठरविण्यात आले.

## दत्तकास परवानगी

दत्तक घ्यायचा झाला तर त्याबद्दल सरकारची पूर्व मंजुरी पाहिजे एरव्ही इनाम जमिनीस बिनमंजुरीचा दत्तक वारस मानला जाणार नाही अशी तरतूद फार पूर्वीपासून एका वटहुकमाने करून ठेवली होती. अर्थात कोणाला केव्हा मंजुरी द्यावी अगर न द्यावी असे प्रश्न निर्माण झाले. यापुढें जाऊन सन १९१४ सालच्या नंबर २६ व ८ या दोन हुकमानें असे ठरविले की मयतास जर भाऊबंद हिस्सेदार असतील तर दत्तक घेण्यास परवानगीच देऊ नये. हे वटहुकूम अर्थात काही थोडयाच इनामाना लागू आहे असे समजले गेल्यानें त्याची स्पष्टता वट नं. २/१३३३ नें करून सर्व तऱ्हेच्या इनामाचे बाबतीत जर इनामदारास भाऊबंद हिस्सेदार असतील तर दत्तकास परवानगी देऊ नये असे ठरविण्यात आले. या पाठीमागील धोरण हेच दिसते की इनामी उत्पन्न नावावाल्याच्या घराण्यातील हक्कदारांचेकडेच जावे. दत्तक म्हणून जो तिऱ्हाईत घराण्यात येतो अशा तिऱ्हाइतास उत्पन्न जाऊ नये. याचा परिणाम इनाम उत्पन्न हे शक्यतो नाववाल्याकडे जास्त एकत्रित होण्यास ( Consolidate ) मदत झाली.

## जदीद व कदीम उत्पन्न

हा वाद जहागिरीतील किंवा दुमालदारांचे हद्दीतील उत्पान्नासंबंधीचा प्रामुख्याने होय. इनामधारकाचे घराण्यांत जे उत्पन्न आले ते मुळ करवीर दरबारकडून आले ( म्हणजे कदीम ) की जहागिरीच्या देणगीने (म्हणजे जदीद) आले हा प्रश्न निर्माण होई. कोल्हापूर दरबारने केलेले सर्वच कायदे किंवा वटहुकूम जहागिरीमध्ये जसेच्या तसे लागू होत नसत. ते लागू करायला काही वेगळे आणि अडचणीचे प्रोसीजर होते. या कारणाने जहागिरीतील उत्पन्न हे जदीद की कदीम हे प्रथम ठरवावे लागे. या साठी देणगी निर्णयाची बाब पुढे आली व त्या दृष्टीने त्यास कोणते वटहुकूम लागतात हे पहावे लागे.

* * *

वटहुकूमापाठीमागील तत्वे अगर धोरणे काय होती व वटहुकूमाने काय निर्बंध घातले गेले याचे स्थूलमानाने मी दिग्दर्शन केले आहे आणि या लेखाचे दृष्टीने अधिक तपशीलात शिरण्याची आवश्यकता नाही. या सर्वावरून इतके स्पष्ट होईल की इनामी मिळखत ही अबाधित ( intact ) राहावी, विखुरलेली असेल तर ती एकत्रित (Consolidate) केली जावी आणि त्यावर सरकारचे सर्व प्रकारचे नियंत्रण ( Control ) राहावे अशा धोरणानी हे सर्व वटहुकूम करण्यात आले. वटहुकूमाची ही सत्ता त्यांची १८४३ ला सुरवात झाली त्यापासून संस्थान असेतोपर्यंत म्हणजे १९४८ अखेर अशी उणीपुरी शंभर वर्षावर अबाधित राहिली. संस्थानच्या अधिकाऱ्यानी व न्यायाधिशानी त्या वटहुकूमातील शाब्दिक व तांत्रिक दोष अगर विसंगति यावर भर न देता दरबारचा हेतु काय आहे हे पाहिले; आणि एकंदरीने त्या हेतूशी सुसंगत असा त्यांचा अर्थ लावला. असा अर्थ लावणे अधिकाऱ्याना जरूरहि होते. कारण कांही श्लेष व न्यून्य काढून सर्वसाधारण धोरणाचे विरुद्ध ठराव करावा तर लगेच दुसरा वटहुकूम काढून सरकारचा हेतू काय हे स्पष्ट करायला व त्यास पूर्वीपासूनचा (retrospective) अम्मल द्यायला शासनसंस्था तयार होतीच. **राजाराम छत्रपती** हे १९४० साली वारल्यानंतर व **शहाजी छत्रपती** हे गादीवर येईपर्यंत दरम्यानच्या काळात न्या. **माडगावकर**, न्या. **लोकूर** सारखे वेगळचा

कायद्यांच्या वातावरणात वावरलेले विद्वान लोक बाहेरून आले. तरी त्यानी सुद्धा फारसा शब्दच्छल न करता वटहुकूमापाठी-मागील सर्वसाधारण धोरणाशी शक्यतो सुसंगत आणि येथील कोर्टातून जे निवाडे झाले होते त्यास Stare Decisis या तत्वाने अनुसरून निकाल केले. तात्पर्य की, कोल्हापुरच्या कायद्याचे एक वैशिष्टय असे हे इनामासंबंधीचे वटहुकूम (आणि ज्यानी कोल्हापुरातील न्यायालयातील प्रकरणाचा मोठा भाग व्यापला होता) त्या वटहुकूमांचे साम्राज्य उणेपुरे शंभर वर्षे आबाधित राहिले हे निःसंशय होय.

## वटहुकूमाची शंभर वर्षे भरली

पण विलीनिकरणानंतर ही परिस्थिती झपाटयानें बदलत गेली. एकतर न्या. माडगावकर यांनी १९४२ ते १९४६ या मुदतीत सुप्रीम कोर्ट जज् नात्यानें इनामी प्रकरणाचा निकाल करताना वटहुकूमामधील गोंधळ, विसंगती, सदोष शब्दरचना इत्यादीवर खूप टीका केली होती. त्या कारणानें त्या वटहुकू-माकडे सर्वांचे विशेषत्वाने लक्ष वेधले होते. तशातच १९४४ साली सरकारवर दावा लावण्याची मुभा मिळाली. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर थोडयाच वर्षात खालसा-तील मि. पेरी, मिचेल, ऑस्टीन असे अॅडमिनिस्ट्रेटर म्हणून अधिकारी आले. रीजन्सी कौन्सिल अस्तित्वात आले. त्यानी महाराजांकडे पडून असलेली इनामी प्रकरणे बाहेर काढून शक्यतो जनतेसारखा न्याय देण्याची कोषीस करायला सुरवात केली. म्हणजे सर्व सत्ताधीश अशा 'हुजूर' च्या दडपणा-खालच्या प्रकरणाना मोकळी व स्वतंत्र हवा लागू लागली. अशा वातावरणात १ मार्च १९४९ नंतरच्या विलिनी-करणाने येथील वरिष्ठ कोर्टातील चालू असलेली सर्व इनामी प्रकरणे मुंबई हायकोर्टाकडे निकालाला गेली आणि तेथे जे व्हावयाचे तेच झाले.

हायकोर्टात गाजलेली पहिली महत्वाची केस आकळे वि. आकळे ( 52 Bom.L.R. 839 ) ही या संदर्भात उदा-हरणादाखल पाहू. यामध्ये अनेक वटहुकूमांचा उहापोह करून काही मूलग्राही तत्वांच्या आधाराने आमच्या इनामी कायद्याचा एक मोठा पाया ढासळला गेला. त्यात असे मानले की 'इनाम मिळखत ही प्रायः सरकारचे मालकीची व इनामधारक हा फक्त life holder व इनाम मिळखत ही पुढे वारसाकडे चालविणे अगर न चालविणे ही सरकार मर्जीची बाब होय' असा आज-वरचा पवित्रा मान्य करण्यासारखा नाही. त्या कारणाने इनामी मिळखत ही विरुद्ध कब्जाने जाऊ शकते हेहि त्या केसमध्ये ठरविले गेले. या अनुषंगाने वटहुकूमातील गोंधळ, न्यूनता वगैरेवर टीकेचा पुनरुच्चार केला गेला व त्यात सुधा-रणा करण्याकडे सरकारचे लक्षहि वेधले गेले.

मुंबई हायकोर्टाचे इतर निकालानी वटहुकूमातील आणखी जे कूट प्रश्न सोडविले किंवा निकालात काढले त्यात 'नष्टांश' या शद्वाच्या व्याप्तीचा उल्लेख केला पाहिजे. नष्टांशाचा अर्थ जो सरळ पुरुष संतती (मुलगा, नातु, पणतु) एवढयाच पुरता मर्यादित केला गेला होता, तो व्यापक करण्यात आला. म्हणजे हिंदु लॉ प्रमाणे ज्या परिस्थितीत नष्टांश ठरेल तेथपर्यंत तो अर्थ व्यापक केला गेला असें म्हणायला हरकत नाही. नष्टांशाप्रमाणें दत्तक मंजूरीच्या अडचणीचीहि वासलात लागली. दत्तकास पूर्व मंजुरीच पाहिजे असे नाही, ती नंतरहि देता येईल असे मानले. आणि अशी मंजुरी देऊ नये असें म्हणणारे वटहुकूम न जुमानता दत्तकास नंतरच्या मंजुऱ्या ( post sanctions ) मुंबई सरकारकडून सर्रास मिळू लागल्या. इनामास मुलगी वारस होते की नाही हा प्रश्नहि मुलीचे बाजूनेच ठरला आणि विशेष हे की मुलगी केवळ वतनी इनामाला नव्हे तर इतर प्रकारच्या इनामालाहि वारस होते असे ठरविण्यात आले.

अशारीतीने वटहुकूमाने निर्माण केलेल्या कूट प्रश्नांचे बुरुज हायकोर्टात ढासळले जात असता सरकारने इनामच नष्ट करण्याचे धोरण स्वीकारून वादाचे मुळासच सुरुंग लावण्यास सुरवात केली. जहागीर अॅबॉलिशन अॅक्ट, संकीर्ण इनाम नष्ट करण्याचा कायदा, पुढे पाटिलकी, गांवसनदी इ. वतने नष्ट करण्याचे कायदे हे या संदर्भात विचारात घेतले म्हणजे पुरे होईल. या कायद्यानी नुसते वादाचे क्षेत्र उखडले गेले एवढेच नाही तर त्याचा परिणाम म्हणजे आजवर इनाम मिळखत जी एकटयाकडे चालत आली त्या मिळखतीतील वाटणी मागण्यास मोकळीक राहिली. आणि ही मोकळीक एकत्र कुटुंबातील सहभागीदारांनाच नव्हे तर फारा वर्षापूर्वी वाटण्या होऊन गेलेल्या दूरच्या भाऊबंदाना देखील मिळू लागली. हे सर्व लक्षात घेऊन मी म्हटले आहे की आमच्या वटहुकूमानी पुरी शंभर वर्षाची कारकीर्द गाजविली हे खरे पण त्याचबरोबर आता त्यांची शंभर वर्षे भरली हेहि सत्य होय. कायदेशीरपणे वटहुकूम अजूनहि अस्तित्वात आहेत. पण त्यांचे अस्तित्व या भारतातील राज्य व अधिकार गेलेल्या संस्थानिकाप्रमाणेच निर्जीव झाले आहे.

## कब्जा विरहित बोजा

गहाण सोडविण्याच्या एका दाव्यात गहाण मिळखतीतून कर्ज फिटल्याचा पुरावा झाल्याने वादीचा दावा कोर्टानी देववला. त्यांचा हु॥ नामा जेव्हा हातात आला तेव्हा दिसून आले की वादीस बोजाविरहित कब्जा देवव्ण्याऐवजी कोर्टानी वादीस 'कब्जा विरहित बोजा' बहाल केला होता.

* * *

# कोल्हापुरातील न्यायाधिशांची परंपरा

लेखक : गणेश रंगो हळदीकर

( परिचय : पान ८ पहा )

अतिक्रांतान्यपि संकीर्त्यमानानि अनुभवसमां वेदनां जनयंति– बाणभट्ट-कादंबरी.

न्यायाच्या व्यवस्थेत न्यायाधीश हाच प्रमुख घटक होय. न्यायाधीश कर्तबगार, कायद्यात निष्णात, निःस्पृह आणि समतोल बुद्धीचा असा असेल तरच न्यायदान हे चोख होणार व न्यायालयाची प्रतिष्ठा राहणार. कोल्हापूरचे विशेष भाग्य हे की येथे जिल्हा न्यायालयाची प्रतिष्ठापना होताच, त्या पदावर पुढे प्रख्यातीस आलेले, अखिल भारतीय कीर्तीचे समाजसेवक व पुढे मुंबई हायकोर्टवर विराजमान झालेले न्या. महादेव गोविंद रानडे यांची नियुक्ति व्हावी. अशा असामान्य, व्यासंगी, विद्वान व न्यायधुरंधर व्यक्तीने न्यायदानाची मुहूर्तमेढ रोवल्यानंतर येथील न्यायालयाची परंपरा उज्ज्वल रहावी हे क्रमप्राप्तच होय. अशा परंपरेच्या मालिकेतील काही ठळक व्यक्तींची माहिती या लेखात दिली जात आहे.

**(१) न्या. महादेव गोविंद रानडे,** एम्. ए., एल्एल्. बी. जन्म १८४२, मृत्यू १९०१. (सप्टेंबर १८६७ ते मार्च १८६८ कोल्हापुरातील कारकीर्द. )

न्या. महादेव गोविंदांचे बालपण व शिक्षण कोल्हापूरांत झाले. करवीर छत्रपतींचे मराठी राज्याचे वैभव बालपणी त्यांनी पाहिले. वयाच्या २५ व्या वर्षी कोल्हापूरच्या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होण्याचा अल्पकालीन असा बहुमान त्यांना मिळाला. येथे असतानाच त्यांना मुंबई सरकारचे ओरिएंटल ट्रॅन्स्लेटर नेमण्यात आले होते. ते काम येथूनच ते करीत. येथे त्यांचे निवाडे थोडेच आहेत. परंतु निकाल अगदी झटपट १ । २ महिन्यांत लावीत. मराठ्यांच्या इतिहासावर Rise of the Maratha Power हे पुस्तक इतिहासावर नवा प्रकाश पाडणारे त्यांनी १९०० चे सुमारास प्रसिद्ध केले. ते त्यांच्या परिणत प्रज्ञेचे फळ होय. परंतु त्याचे बीजारोपण येथेच पूर्व वयात झाले. पुढे पुणे व मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश (२६-११-१८९३ ते १६-१-१९०१ मृत्यूपर्यंत) म्हणून काम केले. त्यांचे निवाडे अद्यापहि मार्गदर्शक आहेत. परंतु राजसेवा करतांना त्यांनी असामान्य बुद्धीमत्तेने निःस्सीम देशभक्तीने जी देशसेवा केली व लोकजागृति केली ती निरंतर संस्मरणीय अशी राहील. त्यांच्या देशसेवेसंबंधी **लो. टिळक** म्हणतात, स्वराज्यनाशाने व पारतंत्र्यामुळे आपला समाज थंड गोळ्याप्रमाणे पडला असता आपल्या ज्ञानाने, विविध चळवळीने, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, वाङ्मयीन वगैरे अनेक प्रकारे लेखणी व वाणी वेचून त्यात ऊब आणून राष्ट्रास संजीवनी दिली, ते माधवरावजी 'सर्वज्ञः स हि माधवः' या विजयनगरच्या माधवाचार्यांप्रमाणे होते. त्यांचे राजकारणातील सच्छिष्य **गोपाळ कृष्ण गोखले** न्यायमूर्तिबद्दल म्हणाले That a nation that has produced a Ranade need not despair of its future! कोल्हापूरच्या न्यायासनावर रानडे विराजमान झाले हे कोल्हापूरास जसे भूषणास्पद आहे तसेच कोल्हापूरसारख्या प्राचीन पुण्यभूमीत व मराठी राज्याच्या छत्रपतींच्या हिंदवी राज्याच्या वैभवशाली राज्यात त्यांचा पूर्वकाळ जावा हेहि रानड्यांचे भाग्य मानावे लागेल. न्या. रानड्यांनी कोल्हापूर येथील उत्तरेश्वराच्या देवालयास रुद्राभिषेक, नैवेद्य करण्यासाठी एक ट्रस्ट केला असून त्याचे व्याजातून प्रतिवार्षिक पूजा, आराधना वगैरे चालू आहे. तेथेच रानडे विद्यालय नांवाची शाळा करवीरस्थानी त्यांच्या स्मरणार्थ चालू केली आहे.

न्या. रानडे हे आमच्या न्यायालयाचे पहिले न्यायाधीश. तेव्हा त्यांची स्मृति व त्यांचा आदर्श सतत डोळ्यापुढे रहावा म्हणून त्यांचे एक तैलचित्र आमच्या जिल्हा न्यायालयाच्या

मुख्य दिवाणखान्यात शतसांवत्सरिक महोत्सव समितीमार्फत लावले जात आहे हे यथायोग्यच होय.

## (२) कै. बळवंत नारायण जोशी, बी.ए.एल्‌एल्.बी.

न्या. रानडे यांच्यानंतर गोपाळ गोविंद फाटक व विश्वनाथ गोविंद चोळकर हे न्यायाधीश झाले व त्यानंतर मेहेरजीभाई कुंवरजी तारापोरवाला यांनी कांही दिवस न्यायाधिशाचे काम केले. मेहेरजीभाई नंतर येथील दिवाण झाले. त्यानंतर बळवंतराव जोशी हे सरन्यायाधीश होते. (१८८२ ते १८९८) यांची सोळा वर्षाची कारकीर्द कोल्हापुरात चांगली गाजली. हे बुद्धीमान, निःस्पृह व चोख न्याय देणारे असे होते. न्यायखात्यावरच नव्हे तर सर्वावर यांचा दरारा असून शिस्तीचे भोक्ते, गुणग्राही, उदार व सढळ हाताने खर्च करणारे असे होते. यांनी शुक्रवार भागात एक मोठा २ चौकी, भव्य व सुशोभित वाडा बांधला. इतका भव्य वाडा ज्यावेळी ते स्वतः वापरीत होते त्यावेळी त्यांचे ऐश्वर्य केवढे असेल याची कल्पना करावी ! वाडयाच्या देवडीवर पहारेवाले, शिपाई. घरातील नोकर वर्ग असे. अनेक दिवाणखाने असलेला तो नक्षीकाम केलेला वाडा होता. त्यांत १ बगी, १ टांगा ही वाहने होती. न्या. बळवंतराव हे छ. शाहु महाराजांचे अज्ञान कारकीर्दीत व त्यांच्या मुखत्यारीनंतर चार वर्षे होते. यांचा सल्ला महाराजास फार उपयोगी पडला त्यामुळे महाराज यांना फार मानत. लो. टिळक यांचे येथे उतरत व बर्वे प्रकरणी बळवंतरावानी टिळक, आगरकराना सहाय्य केले. बाणेदार, निःस्पृह व निःपक्षपाती न्याय देणारे व करवीर छत्रपतींचे हितचिंतक, त्यांचे कौन्सिलर, इ. प्रकारे संस्थानची सेवा करून न्यायखात्यात महनीय परंपरा निर्माण केली. ना. फेरोजशहा मेथा, विश्वनाथराव मंडलीक असे मुंबई हायकोर्टाचे वकील यांचेपुढे काम चालविण्यास येत. यांचा वाडा त्यांनी सरकारी कर्ज काढून बांधला. त्यासाठी व त्यांना पुरुष संतती नसल्याने त्याचा मोह न ठेवता तो वाडा आपणहून त्यांनी तो सरकारास दिला. तो शुक्रवार–वाडा म्हणून प्रसिद्ध आहे व त्यातच पूर्वी दिवाणी कोर्टे व नंतर राजाराम हायस्कूल भरत असे. यावरून तो वाडा केवढा मोठा असेल याची कल्पना यावी. यांची कीर्ति अद्यापहि लोक आदराने स्मरतात. अशा थोर न्यायाधिशाचे स्मारक म्हणून सदर वाडयास "बळवंत नारायण जोशी वाडा" असे नांव द्यावे असे सुचवावेसे वाटते.

## (३) कै.कृष्णाजी नारायण पंडितराव, बी.ए.एल्‌एल्.बी.

(जन्म २२ सप्टेंबर १८६४. मृत्यू २५-१२-१९४८.)

दान्तं कुलीनं मध्यस्थम् अनुद्वेगकरं स्थिरम् ॥
परत्रभीरुम् उद्युक्तं धर्मिष्ठं क्रोधवर्जितम् ॥

— कात्यायनस्मृति

बळवंतराव जोशी यांच्या निःस्पृह व बुद्धिमान व शिस्तीच्या न्यायाधीशांच्या जागेवर कृ. ना. पंडितराव यांची १८९८ मध्ये नेमणूक झाली व त्यांच्या पूर्वीच्या मुन्सफ (सि. जज्ज) च्या जागेवर श्री. भास्करराव विठोजीराव जाधव, एम्. एल्‌एल्. बी. हे आले. या नेमणुका शाहू महाराज यांच्या सज्ञान कारकीर्दीत झाल्या. उभयताहि दीर्घायुषी व कीर्तीवंत झाले. स्मृतिकारांनी वर वर्णिलेले न्यायाधीशांचे गुण पंडितराव यांचे अंगी वसत होते. ते वैष्णव ब्राम्हण असल्यामुळे सोवळे, देवदेवतार्चन व धार्मिक आचाराचे ते मूर्तिमंत प्रतिक होते. गौरवर्ण, प्रसन्न मुद्रा, रुपाने देखणे असे ते होते. कपाळावर काळी उभी रेघ, अक्षतेचा काळा गोल टिळा, आंखावर शंखचक्रांतीत मुद्रा, नित्यनेमाने श्री महालक्ष्मीचे दर्शन इत्यादी त्यांचे आचारधर्म हे करवीर जनतेस आदर्श होते. संस्कृत, इंग्रजी, मराठी या भाषेतील ग्रंथाचा व्यासंग मोठा होता. नेहमी प्रसन्न मुद्रा, मितभाषण व न्याय देण्यात निःस्पृह निपुणता याबद्दल ते सुविख्यात होते. १९०८ साली येथील 'विश्ववृत्त' या राजकीय मासिकात पं. (आता पद्मभूषण) श्रीपाद दामोदर सातवळेकर यानी "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" हा लेख छत्रपतीच्या विरुद्ध राजद्रोही

## डिस्ट्रिक्ट बार असोशिएशनचे अध्यक्ष

१९२७ साली बार असोशिएशनची स्थापना करायची कल्पना प्रथम आली तेव्हा वादविवाद होऊन एकाच वेळी दोन असोशिएशन्स स्थापन झाल्या. एकीचे अध्यक्ष कै. रामचंद्र मोरेश्वर आपटे व दुसरीचे अध्यक्ष कै. अण्णा-राव मुळे हे होते. पुढे समझोता होऊन एकच अधिकृत असोशिएशन दि. १७-२-२९ ला स्थापन झाली. तेथून पुढील अध्यक्ष खालीलप्रमाणे होते.

कै. एस्. आर. श्रीखंडे १९२९ ते ३५
कै. वि. वि. जोशी १९३५ ते ३८
श्री. दत्तात्रय नारायण सरलष्कर ३८ ते ४३
श्री. शंकर गोपाळ दाभोळकर ४३–४४
कै. गोपाळ कृष्ण सोवनी १९४५–४६
श्री. आर. एन्. पुसाळकर १९४७–४९
कै. बा. र. तेंडुलकर १९४९–५०
श्री. व्ही. टी. पाटील १९५०–५१
श्री. एम्. डी. श्रेष्ठी १९५१–५२
श्री. जी. के. हातकणंगलेकर १९५२–५३
श्री. एस्. व्ही. आपटे १९५३–१९५७
कै. वा. द. अडके १९५७–५९
श्री. दिगंबर एन्. सरलष्कर १९५९–६१
श्री. एन्. ए. नांद्रेकर १९६२–६४
श्री. डी. एस्. खांडेकर १९६४–६६
कै. बी. पी. कलवडे } १९६६–६७
श्री. आर. आर. हर्षे } १९६६–६७
श्री. न वि. जोशी १९६७–

आहे म्हणून खटला करवीर सरकारतर्फे भरला होता. मासिकाचे संपादक 'प्रो. वि. गो. विजापूरकर, एम्. ए. व वामन मल्हार जोशी, एम्. ए. (पुढे रागिणी इ. कादंबरीचे कर्ते) हे आरोपी होते. पंडितराव व विजापूरकर यांचा स्नेह असल्यामुळे हा खटला आपल्यापुढे चालू नये अशी त्यांनी छ. शाहू महाराजास विनंती केल्यावरून पुण्याचे डि. जज्ज मि. किंकेड यांच्यापुढे सदर खटला येथें चालून वरील दोघास ३ वर्षाची शिक्षा झाली. पुढे सातवळेकर हजर झाले व त्यांच्यावर पूर्वोक्त लेखाचे लेखक म्हणून खटला भरला तो श्री. पंडितराव यांचेपुढे चालला.सदर खटल्यात पंडितराव यांनी सातवळेकराना निर्दोषी ठरवून सोडून दिले व किंकेडसाहेबांच्या ठरावावर टीका केली. हे इंग्रज सरकारास न आवडून दडपणामुळे ३ पेन्शनवर वयाच्या ४६ व्या वर्षी त्यांना निवृत्त व्हावे लागले व निःस्पृह न्यायदानाचे व्रत त्यानाच भोवले. १९१० निवृत्तीचा काळ त्यांनी धार्मिक ग्रंथ वाचन, श्रवण यात घालविला. पुढे राजाराम महाराज यांनी कोल्हापूर येथे सुप्रीम कोर्ट स्थापन केले (१९३१). त्यांत पंडितराव यांची सुप्रीम कोर्ट जज्ज म्हणून नेभणूक केली व एकपरीने कोल्हापूर दरबारने त्यांच्यावर केलेला अन्याय भरून काढला. हे काम त्यांनी १९३१ ते १९४१ अखेरपर्यंत केले. १९०९ सालच्या राजकीय परिस्थितीत सातवळेकराना सोडून देण्यात त्यांनी असामान्य धैर्य दाखविले व त्याकरिता आर्थिक हानीची पर्वा बाळगली नाही !

विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ही की हरिजनाना मंदिर प्रवेश मिळावा याबद्दल भारतात मोठी चळवळ होती. सनातनी मंडळींचा विरोध होता. श्री. पंडितराव यांनी हरिजनाना मंदिर प्रवेश देण्यास हरकत नाही असे जाहीर सभेत भाषण करून कांही हरिजनाना स्वतः घेऊन महालक्ष्मीच्या मंदिरात प्रवेश केला. अस्पृश्यता निवारण्याचे कोल्हापुरातील कार्य सुलभ झाले. सामाजिक बाबतीत त्यांची मते उदार होती. अध्ययन, अध्यापनाची आवड होती. यांचा विद्याव्यासंग आमरण होता.

**(४) विश्वनाथ बल्लाळ गोखले,** बी.ए.एलएल्.बी. (जन्म १७-२-१८५८, मृत्यू ३१-७-१९३१.)

यांचे वडील बाळाजी विश्वनाथ १८४४ साली छ. शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज यांच्या अज्ञान कारकीर्दीत सदर अमीन होते. त्यांनी अनेक वर्षे कोल्हापुरात न्यायदान केले. या स्मरणिकेत त्यांच्या ठरावाचा उल्लेख आहे. विश्वनाथरावजींचे शिक्षण राजाराम हायस्कूल, एलिफिन्स्टन कॉलेज, लॉ स्कूल मध्ये होऊन (१८८२) ते एलएल्.बी. झाले. लगेच यांची न्यायखात्यात नेमणूक झाली. हे डि. मॅ. असताना कर्नल रे ( wray ) वि. फर्नांडिस म्हणून गाजलेला विषप्रयोगाचा खटला यांचेपुढे आला.नव्या राजवाड्यात ना. जेमस मुंबईचे कौन्सिलर यांना दरबारतर्फे मेजवानी देण्यात आली. त्याची व्यवस्था पोलिटिकल कर्नल रे यांनी करण्याची होती. त्यात रे वर विषप्रयोग त्यांच्या बटलर मार्फत होणार आहे असे निनावी पत्र रे साहेबास आले. समारंभास आणलेले पाव काढून दुसरे ठेवण्यात आले. काढून ठेवलेल्या पावात काचेची पूड सापडली. झाले ! हे प्रकरण पेटले. गादीवर येऊन उणीपुरी ३ वर्षे होतात, तोच मल्हारराव होळकरप्रमाणे शाहू महाराजावर कमिशन बसवावे असा गवगवा रे वगैरेनी केला. याप्रसंगी हा विषप्रयोग खटला विश्वनाथराव यांचेसमोर चालला. त्यात त्यांनी असामान्य धैर्य दाखवून, कोणाचेहि दडपण न मानता, रागालोभाची पर्वा न करता निर्भयपणे निकाल दिला. बुद्धिमत्ता, चातुर्य दाखवून सदर बनावट खटला आहे असे सिद्ध केले. संकटातून करवीर दरबारची मुक्तता केली ! अधिक माहिती लठ्ठेकृत शाहू महाराजांचे चरित्र भाग १ यात पहा. या खटल्यात त्यांचे न्यायचातुर्य प्रथम प्रकट झाले. पंडितराव सरन्यायाधीश यांच्या सक्तीच्या निवृत्तीनंतर १-५-१९१२ ला विश्वनाथरावजी सरन्यायाधीश झाले व १९२१ साली निवृत्त. यांचे निवाडे अत्यंत विद्वत्तापूर्ण, श्रुतिस्मृतिचे आधार, सर्व हायकोर्टाचे आधार, पुरावा यांचे विवेचन करून लिहिले आहेत.दत्तक जाणा रास पुत्र असेल तर पूर्व घराण्यातील दत्तक जाणाऱ्याचा मुलगाहि दत्तक घराण्यांत-गाईबरोबर वासरू जाते त्याप्रमाणे-जातो या मुद्द्यावरचा ठराव सुप्रसिद्ध आहे. यात स्मृतिशास्त्राचे पूर्ण विवेचन करून लिहिलेला 'सवत्सधेनु' (गाईबरोबर तिचे वासरूहि जाते या अर्थाने) ठराव म्हणून प्रसिद्ध आहे. (पुढे हा ठराव फुल कौन्सिल बसवून फिरविण्यात आला. हा भाग निराळा.)

उंचेपुरे, भव्य आकृति, गोरेपान, देखणे, रुपसंपन्न, तेजःपुंज उभट तोंडावळा, भव्य कपाळ, भेदक डोळे असे विश्वनाथरावजी भस्म लावून सोवळधाने शालजोडी पांघरून हातात पूजापात्र व पुढे पट्टेवाला शिपाई घेऊन नित्यनेमाने महालक्ष्मीस व कपिलेश्वर, ब्रम्हेश्वर या देवतांस पूजेकरिता सकाळी ९ ते १० दरम्यान मंत्र म्हणत म्हणत जात असत. इंग्रजी शिकूनहि हा त्यांचा आचार पाहून अर्धशिक्षित नास्तिक

## कोल्हापुरातील सरकारी वकील

कै. गोविंद कृष्ण सोवनी १८९३-१९२१
कै. गणेश विश्राम वायंगणकर १९२१-२३
कै. गोपाळ नारायण दाभोळकर १९२४-२५
कै. रावसा. यशवंत गोविंद सोवनी १९२५-४४
श्री. एन्. जी. देव १९४४-४७
कै. वामन दत्तात्रय अडके १९४७-४९
कै. व्ही. ए. ब्रम्हदंडे १९४९-५०
श्री. आर. एन्. पुसाळकर १९५०-५१
श्री. एस्. आर. कुलकर्णी १९५१-५७
श्री. एम्. व्ही. धर्माधिकारी १९५७-६७
श्री. जी. एस्. इंदुलकर १९६७

म्हणविणारे स्तिमित होत. इंग्रजी, मराठी व संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व होते. वेदशास्त्राभिनंदिनी, सभा, गायन समाज, करवीर नगर वाचन मंदिर, राजारामियन क्लब या संस्थांशी त्यांचा निगडित संबंध होता. वाचनाचा व्यासंग जबर होता.बाहेरचे निरनिराळ्या विषयावरील वक्ते येथे येत.विश्वनाथरावांना नेहमी अध्यक्षस्थान देण्यात येई त्यावेळी वक्त्याच्या विषयांचा योग्य परामर्श घेऊन त्याच्या भाषणातील उणीव दाखवीत.त्यांच्या ठिकाणी जुन्या पिढीतील व्यासंग,अष्टपैलु विद्वत्ता, न्यायचातुर्य, वैदिक धर्मातील मूर्तिमंत आचार, अनेक विषयात संचार करणारी बुद्धी एकत्र दिसली तशी अजून दृष्टीस पडली नाही. विद्वत्ता, परोपकारीपणा, धर्मनिष्ठा, करारीपणा इत्यादि गुणामुळे ते लोकप्रिय होते. शाहू छत्रपतीवर यांची भक्ति होती. शाहू महाराज यांना कृतज्ञतेने फार मानत.

**(५) ना. भास्करराव विठोजीराव जाधव,एम्. ए., एल्एल्. बी.** (जन्म १७-६-१८६७, मृत्यू २६-६-१९५०.)

मराठा समाजात जे विद्वान, व्यासंगी, तळमळीचे असे नेते निर्माण झाले त्यात भास्कररावांना पहिल्या दर्जाचा मान द्यावा लागेल.

मॅट्रिक परीक्षेत १ ला नंबर (१८८८), बी. ए. पहिला वर्ग (१८९२), एम्. ए. पहिला वर्ग (१८९४), एल्एल्. बी. (१८९७) याप्रमाणे विद्याविभूषित होऊन कोल्हापूरात न्यायखात्यात प्रविष्ट झाले. डि. मॅं. सेशन्स जज् म्हणून दिवाणी कामातील अपिलेंट बेंच जज् म्हणून. त्यावेळच्या नाणावलेल्या पंडितराव, विश्वनाथराव गोखले यांच्या बरोबरीने कार्य केले व त्यांच्या उज्ज्वल परंपरेत मानाचे स्थान मिळविले. संस्कृत, मराठी व इंग्लिश भाषेवर प्रभुत्व होते. याखेरीज त्यांच्या विविध क्षेत्रातील महनीय व भरीव कार्याचे वर्णन : सहकारी चळवळीचे आद्य प्रणेते, को. म्यु. चे अध्यक्ष, सरसुभे, मुंबई सरकारचे शिक्षण मंत्री, शेतकी व अबकारी मंत्री, ब्राम्हणेतर व सत्यशोधक समाजाचे आधारस्तंभ, उत्कृष्ट वक्ते, मध्यवर्ती

## Names of the Principal Judges of Kolhapur 1867 to 1968

1. **Shri Mahadev Govind Ranade**, M. A., LL. B. ( Nyayadhish of Kolhapur September 1867 to March 1868).
2. **Shri Gopal Govind Phatak**, Nyayadhish.
3. **Shri Vishwanath Govind Cholkar**, Nyayadhish.
4. **Khan Bahaddur Meherjibhai Kuwarji**, C. I. E. Sar-Nyayadhish.
5. **Shri Balwant Narayan Joshi**, B. A., LL. B. 1882 till his death on 23-2-1898.
6. **Shri Krishnaji Narayan Panditrao**, B. A., LL. B. 1898 to 1911.
7. **Shri Vishwanath Ballal Gokhale**, B. A., LL. B. 1-5-1912 to 1921.
8. **Shri Annasaheb Babajirao Chougule**, B. A., LL. B. 13-1-1922 to 30-5-1931.

### Chief Judges of the Kolhapur High Court

9. **Shri A. B. Chougule**, 31-5-1931 till his death on 3-7-1933.
10. **Rao Bahaddur Raghunath Pandurang Sawant**, B. A., LL. B. Bar-at-Law 3-7-1933 to 5-7-1943.
11. **Diwan Bahaddur Ramchandra Martand Bhise**, B. A., LL. B. 5-7-1943 to 2-4-1945.
12. **Rao Bahaddur Vinayak Narayan Deo**, B. Sc. LL. B. 2-4-1945 to 1-3-1946. After establishment of Joint High Court for Kolhapur and the Deccan States, Chief Judge of that High Court from 1-9-1946 to 1-4-1947.
13. **Sir Harsidhabhai Vijjubhai Divatia**, M. A., LL. B. Chief Judge of the Joint High Court 1-3-1946 to 31-8-1946.
14. **Shri Narayanrao Swamirao Lokur**, B. A., LL. B. Chief Judge of the Joint High Court from 2-4-1947 to 30-6-1947. From 1-7-1947 to 28-2-1949.Chief gudge of the Kolhapur High Court.

### District Judges after Merger

15. **Shri S. B. Palekar**, B.A., LL.B. 5-5-49 to 20-4-50.
16. **Shri S. H. Naik**, M. A., LL. B. 8-5-50 to 23-4-51.
17. **Shri. M. S. Patil**, B.A., LL. B. 28-4-51 to 12-2-52.
18. **Shri V. G. Jamkhindi**, M. A., LL. B. 17-3-52 to 10-3-56.
19. **Shri R. S. Ambekar**, B. A., LL. B. 23-4-56 to 1-10-56.
20. **Shri V. B. Raju**, M. A., I. C.S. 31-10-56 to 15-12-58.
21. **Shri L. M. Paranjape**, M. A., LL. B. 15-12-58 to 27-9-60.
22. **Shri T. P. Ghogale**, B. A., LL. B. 27-9-60 to 20-12-60.
23. **Shri R. K. Ranade**, L. L. M. 20-5-61 to 7-12-62.
24. **Shri P. S. Malvankar**, M. A., LL. B. 13-12-62 to 12-6-66.
25. **Shri R. K. Joshi**, B.A., LL.B. 13-6-66 to 4-4-68.
26. **Shri Karnik**, B.A., LL. B. 17-4-68.

विधी मंडळांत रीजन्सी कौन्सिलातील महसूल मंत्री, मराठ्यांची कुलदैवते इ. ग्रंथांचे व अनेक विषयावर लेखांचे लेखक इ. त्यांच्या कार्याचे, व्यापाचे वर्णन पाहता त्यांचा आमरण विद्याव्यासंग पाहून आदर निर्माण होतो. भव्य, उंच, रुबाबदार व त्यांच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहताच त्यांच्या चालीत आत्मविश्वासाचे जे तेज होते त्याचा प्रत्यय येई. त्यात मराठाशाहीच्या अभिमानाने असो अगर वैशिष्ट्यामुळे असो, ते नेहमी फेटा बांधीत. त्यात लीलेने फडकणारा फेट्याचा तुरा असे व पाठीवर पसरलेला शेंबला सोडीत. दृष्टिः स्तृणीकृतजगत्त्रय सत्त्वसारा । धीरोद्धता... गतिः धरित्रीम् ॥... उतदर्प एषः ॥ या भवभूतीच्या वचनाची आठवण होती. त्यांचा परिचय झाल्यानंतर विशाल अंतःकरणाची साक्ष पटे. त्यांच्या स्नेहीमंडळीत अनेक ब्राम्हण गरीबापासून श्रीमंतापर्यंत असत. न्याय निःपक्षपाती व चोख असे. इंग्रजी वाङमय त्यांनी मूलग्राही दृष्टीनें वाचले होते. त्यांनी रामायणावर जी नव्या दृष्टीकोनाने लेखमाला लिहिली ती त्यांच्या स्वतंत्र व निर्भिड विचारसरणी व विद्वत्ता यांची द्योतक आहे.

कोल्हापुरच्या सुप्रीम कोर्टावर त्यांची नेमणूक केली होती. रीजन्सी कौन्सिलचे वेळी ते येथील रेव्हेन्यू मिनिस्टर होते. अव्याहत विद्याव्यासंग, प्रचंड मित्रपरिवार, दीर्घायुषी, कणखर वृत्ति, परोपकारी व भाग्यवान पुरुषात त्यांची गणना करावी लागेल.

**(६) न्या. रावबहादुर ए. बी. चौगुले,** बी. ए. एलएल्. बी.

हे कोल्हापुरांत हायस्कूल, कॉलेजचे शिक्षण घेऊन बी. ए. ला डेक्कन कॉलेजला गेले. तेथून मुंबईस एलएल्. बी. होऊन १९१० साली यांची न्यायखात्यांत मुन्सफाच्या जागेवर नेमणूक झाली. पुढे त्यांची कामगिरी पाहून रा. ब. विश्वनाथराव गोखले सेवानिवृत्त झाल्यानंतर ते १९२१ साली सरन्यायाधीश झाले. त्यांनी ते काम चांगल्यारीतीने करून कोल्हापुरची न्याय परंपरा चांगल्यारीतीने चालविली. निःस्पृह व चोख न्याय यांचेपासून मिळे. यांचा दरारा न्यायासनावर बसल्यावर सर्वास वाटे. भव्य परंतु किंचित् उग्र भासणारा असा चेहरा असल्यामुळे यांचेपुढे साक्षीदार सहसा खोटे बोलण्यास धजत नसे. व तसे दिसून आल्यास कडक शासन करीत. म्हनुबी प्रकरण म्हणून एक गाजलेला फौजदारी खटला यांचेपुढे ४२ दिवस चालला होता. परंतु कसल्याहि दडपणास अगर भिडेस बळी न पडता त्यात त्यांनी आरोपीस कडक शासन केले. त्यामुळे त्यांची कीर्ती वाढली. बहुजन समाजात शिक्षण प्रसार होऊन त्यातून निर्माण झालेले ना. भास्कररावाप्रमाणें चौगुले होते. यांनी कोल्हापुरची न्यायाधीशांची परंपरा उज्ज्वल ठेविली.

**(७) न्या. रावसा. विष्णू गणेश चव्हाण,** बी. ए., एलएल्. बी. ( जन्म १८८९, मृ. १४-१०-६७. )

राजाराम कॉलेजमधून शिक्षण. रावसा. चौगुले यांचेनंतर दहा वर्षांनी न्यायखात्यांत प्रवेश. डि. मॅ. मुन्सफ व नंतर डिस्ट्रिक्ट जज्, कोल्हापुरचे हायकोर्ट जज् अशा चढत्या श्रेणीनें उच्च पदस्थ झाले. यांच्या निःस्पृह व निःपक्षपाती न्यायदानाची ख्याती रावसा. चौगुले यांचे प्रमाणेच असल्याने त्याच गुणाची पुनरुक्ति करीत नाही. शांत स्वभाव. ते कधीही चिडखोरपणाने वागत नसत. काम निरलसपणे करीत. सेशन्स जज् व दिवाणी अपीलें ऐकून निर्णय साधक बाधक विचार करून चांगला करीत. संस्थानात प्रथम मराठीतून निवाडे दिले जात. पण नंतर इंग्रजीमधून दिले जाऊ लागले तेव्हा चव्हाणांनी फार चांगल्या भाषेमध्ये आपले निकाल दिले. त्यांचे मराठी व इंग्रजी हस्ताक्षर अपवादात्मक ठरावे इतके चांगले होते. यांना टेनिस, क्रीडा व संगीत, या कलेचा नाद असे. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता तरी त्याचा परिणाम न्यायदानावर कधीहि होत नसे. कोल्हापूर हायकोर्टचे ते प्यूनी जज् होते. अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे ते अध्यक्ष व शासनप्रमुख असे होते.

**(८) न्यायविशारद रा. ब. बॅ. रघुनाथ पांडुरंग सावंत,** बी. ए., एलएल्. बी. बार-अॅट-लॉ. (जन्म १८९८, मृत्यू १-१-१९६५.)

निःस्पृहपणें न्यायदान, निष्कलंक चारित्र्य, सामाजिक समतेची आस्था, शैक्षणिक प्रश्नासंबंधी आपुलकी, वागण्यात प्रेमळ, स्पष्ट वक्तेपणा इ. गुणामुळे न्या. सावंत यांनी करवीरची परंपरा सुशोभीत केली. कोल्हापुरातच सर्व शिक्षण. मुंबई युनिव्हर्सिटीची एलएल्. बी. पदवी घेतल्यानंतर राजाराम महाराजांनी त्यांना इंग्लंडास पाठविले. बॅ. झाल्यानंतर त्यांना रा. ब. चौगुले यांच्यानंतर कोल्हापूर हायकोर्टाचे चीफ जस्टीस नेमण्यात आले. ( ३-७-१९३३ ते ५-७-१९४३ ) कोल्हापूर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे स्पीकर ( सभापती ), दरबारचे ज्युडिशियल मिनिस्टर, कोल्हापुरच्या औद्योगिक कोर्टाचे अध्यक्ष इ. अनेक कामे त्यांनी केली. यांना 'न्याय विशारद' व 'रा. ब.' या पदव्या हिंदुस्थान सरकारातून मिळालेल्या होत्या. विलिनीकरणानंतर त्यांनी मुंबई हायकोर्टात १२ वर्षे वकिली केली. तेथेंही चांगला लौकिक संपादन केला.

**(९) रा. ब. शंकरराव आबाजीराव इंदुलकर,** बी.ए.

शंकरराव इंदुलकर यांचे सर्व शिक्षण कोल्हापूर येथे झाले. बी. ए. नंतर एलएल्. बी. च्या टर्मस् भरल्या होत्या. परंतु राजर्षि शाहू महाराजांनी त्यांना आपले हुजूर चिटणीस नेमिले. त्यानंतर त्यांनी अनेक कामे केली व रेव्हेन्यु खात्यात वरिष्ट अधिकारी सरसुभे म्हणून बरीच वर्षे काम केले. ती त्यांची कारकीर्द संस्मरणीय अशी झाली. विशेषतः वटहुकूमांचे एकत्रिकरण, वर्गवारी, विषयवारी वगैरे करून त्याचे दोन मोठे खंड छापून प्रसिद्ध केले व तो कायदा समजण्यास सुलभ केला. ही त्यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय होय. ते कांही दिवस रेव्हेन्यु मिनिस्टरहि होते.

त्यांचा विद्याव्यासंग जबर होता. १७ वर्षे ते करवीर नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष होते. नित्य-नेमाने लायब्ररीस भेट देत. जाताना १०।१२ पुस्तकें मोटारीतून वाचण्यासाठी घेऊन जात. इंग्रजी व मराठी पुस्तकें वाङमय, काव्य, नाटके इ. विषयावरील असत. त्यांच्या प्रोत्साहनाने करवीर नगर वाचन मंदिराचा ८० वा महोत्सव झाला व करवीर साहित्य संमेलन येथे भरले. क्रीडा व संगीत हे त्यांच्या आवडीचे विषय. त्यांच्या मित्रपरिवारात गवई, नट, चित्रकार, डॉक्टर, वकील इ. सर्व थरातले गरीबापासून श्रीमंतापर्यंत लोक असत. पण न्यायदानाबद्दल त्यांची निःस्पृहता अबाधित असे. शंकररावांच्या मृत्यूने कोल्हापूरच्या वाङमय, कला व मुलकी क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. त्यांचे वर्णन " आदर्शः शिक्षितानां, स्वगुण फलनतः सज्जनानां कुटुंबी " या शब्दात करता येईल !

(१०) आपल्या बुद्धीमत्तेने व निःस्पृहतेने चोख न्यायदान करणाऱ्या ज्या व्यक्ति कोल्हापूरास लाभल्या त्यामध्येच कै. **ज्ञानदेव बळवंत माळी**, बी. ए., एल्एल्.बी. यांची गणना करणे जरूर आहे. ते बहुजनसमाजापैकी लिगायत ज्ञातीतील होय. मुळची स्थिती गरिबीची व प्रतिकूल असताहि त्यांनी येथे, पुणे व मुंबईपर्यंत जाऊन उच्च शिक्षण घेतले. कोल्हापूरच्या न्यायखात्यात त्यांनी विविध कामगिरी केली. मुलकी खात्यात प्रांत, सरसुभे या हुद्यावर व नवीन सर्व्हे अम्मल करायचे वेळी त्याचे वरिष्ट अधिकारी म्हणून काम केले. त्याचप्रमाणे डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज् व काही वर्षे हुजूर बेंच कोर्टावरहि त्यांनी काम केले. त्यांचा स्वभाव मनमोकळा होता व न्यायदान झटपट करीत. अशा गुणानी त्यांनी चांगला लोकादर प्राप्त करून घेतला.

(११) १९४० ला राजाराम छत्रपति निधन पावल्या-नंतर विलिनीकरणापर्यंत बाहेरून जे अनेक नामवंत न्याया-धीश आले त्यामध्ये सर्वप्रथम उल्लेख सर **गोविंद माडगावकर** यांचा केला पाहिजे. न्या. माडगावकर हे मुंबई हायकोर्टाचे एक ख्यातनाम असे न्यायाधीश होते. त्यांची नेमणूक येथे सुप्रीम कोर्ट जज् म्हणून झाली. ते असलेल्या कारकीर्दीत त्यांनी जे अत्यंत महत्वपूर्ण निकाल दिले ते कोल्हापूर लॉ रिपोर्टस् अशा नावाने चार भागात प्रसिद्ध केले आहेत. कितीहि अडचणीचा कायद्याचा अगर वटहुकमाचा प्रश्न असो किंवा कितीहि गुंतागुंतीच्या घटना व हकीगती facts असोत त्या सर्वांची पकड ते ताबडतोब घेत आणि अचूक निर्णयाला येत. ते निकाल उघड भर कोर्टात सांगत. त्यांची सांगण्याची पद्धत अतिशय जोरदार आणि त्यांची शद्बरचना फार समर्पक व समर्थ अशी असे. या कारणाने त्यांचे dictation ऐकताना फार आनंद वाटे. त्यांनी कोल्हापुरा-तील न्यायालयासंबंधी रिपोर्ट केला त्या बद्दलचा उल्लेख पहिल्या लेखात झालेलाच आहे. म्हणून द्विरुक्ति करत नाही.

न्या. **दिवेटिया** यांनी येथील जॉईंट हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश व न्या. **लोकूर** यांनी येथील हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कांही वर्षे काम केले. दोघेहि मुंबई हाय-कोर्टाचे सेवानिवृत्त नाणावलेले न्यायाधीश तेव्हा त्यांच्या-संबंधी वेगळा गुणगौरव करण्याची आवश्यकता नाही. त्यापैकी न्या. लोकूर हे येथे अधिक काल राहिले. त्यांनी सुप्रीम कोर्टाचेहि काही काल काम पाहिले. त्यांची कायद्याची तयारी फार चांगली व स्वभाव अतिशय शांत होता. या कारणाने ते थोड्याच अवधीत लोकप्रिय झाले. विलिनीकरणाचेवेळी हायकोर्टाबरोबर त्यांची कारकीर्द संपुष्टात आली त्यावेळी वकीलवर्गाने त्यांना व त्यांचे सहकारी न्या. सावंत व न्या. चव्हाण यांना थाटाचा व भावपूर्ण असा निरोप दिला होता.

## वंदन

वंदन तुज मंगलमय न्याय देवते
खड्ग तुला धारि गंभिर रूप संपदे ।। धृ. ।।

सत्यासत्यातुन तू निपट निवडिशी
कपटजाल विरल करुनि पूर्ण काढिशी
" सत्यमेव जयति " असा निर्णयवरदे ।। १ ।।

तेजस्वी धवल अशी कीर्ति गाजता
वरुषे शंभर झाली पूर्ण तत्वता
म्हणुनि गाति यशोगान भक्त तव मुदें ।। २ ।।

न्यायदान सतत असे उज्वल राहो
नांव ठेवण्यास मुळी वाव न राहो
ब्रीद थोर सतत तुझें घुमत राहुदे ।। ३ ।।

— कृष्णकुमार


( श्री. श्रीधर कृष्ण सोवनी बी.ए. एल्एल्बी. वकील यांनी आजवर अनेक कविता लिहिल्या असून त्या ठिकठिकाणी प्रसिद्ध झाल्या आहेत. या महोत्सवाचे निमित्ताने त्यांना स्फुरण पावलेले हे काव्य होय. )

# हायकोर्ट न्यायाधीशपद मंडित केलेले कोल्हापूरचे सुपुत्र



कै. एस्. आर. तेंडुलकर,
बार-अॅट-लॉ
मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश

कै. आर. एस्. बावडेकर,
आय्.सी.एस्.
मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश



श्री. एस्. बी. ढवळे



कोल्हापूरचे पहिले आय्.सी.एस्.
पाटणा हायकोर्टाचे न्यायाधीश



श्री. एम्. व्ही. परांजपे.
बी.ए.एल्एल्.बी.
महाराष्ट्र हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश

श्री. एम्. एस्. आपटे,
बी.ए.एल्एल्.बी.
महाराष्ट्र हायकोर्टाचे न्यायाधीश



# काही दिवंगत न्यायाधीश



वि. ग. चव्हाण
परिचय पान ३१



र. पां. सावंत
परिचय पान ३१



शं. आ. इंदुलकर
परिचय पान ३१


# काही दिवंगत वकील



कृ. अ. ताम्हनकर
परिचय पान १३



य. गो. सोवनी
परिचय पान १२



व. खं. बागल
परिचय पान १२



वा. द. अडके
परिचय पान१३

# काही दिवंगत वकील



यशवंत गंगाधर अभ्यंकर
१९ व्या शतकातील एक वकील



वि. कृ. राशिंगकर
परिचय पान १०



गो. कृ. सोवनी
परिचय पान १२



रा. मो. आपटे
परिचय पान ११



रा. ना. पंगू
परिचय पान ११



खं. गो. बागल
परिचय पान १२



स. रा. श्रीखंडे
परिचय पान १२



वि. वि. जोशी
परिचय पान ११

# प्रयाग [ कोल्हापूर ] वरील स्नेहसंमेलन

दोन वेगवेगळ्या संस्थांचे एकीकरण होऊन दि. १७-२-२९ ला एकच बार असोसिएशन स्थापन झाल्यानंतर अधिकारी वर्ग, न्यायाधीश, वकील व त्यांचे कारकून, शिपाई वगैरेंचे मेळीने जानेवारी १९३० ला झालेले असे हे न्यायालयीन इतिहासातील बहुतेक पहिलेच स्नेहसंमेलन मानावे लागेल. याच साली बार असोसिएशन विरुद्ध जॉली क्लब असा मित्रत्वाचा सामनाही (५-१२-३०) झाला. तोही त्या तऱ्हेचा पहिलाच सामना होय. या फोटोतील व्यक्तींची नावे समजू शकली तितकी खाली दिली आहेत.



खुर्चीवर : नारायणराव सावत, पाचलग, वि. वि. जोशी, रामभाऊ गोखले, तात्या आपटे, न्या. भोसले, श्री. डी. एम्. भोसले ( होम सेक्रेटरी ), श्री. दादासाहेब सुर्वे ( न्या. चौगुले, न्या. चव्हाण, न्या. कारखानीस, न्या. माळी, बापूराव श्रीखंडे.

बसलेले : X , मिराशी ( लायब्ररीयन ), नाना गुणे, व्ही. टी. पाटील, पुसाळकर, व्ही. एच्. घोरपडे, हळदीकर, हर्षे, शिरढोणकर, के. आर. आपटे, एम्. बी. देशपांडे,

उभे : ताम्हनकर, जी. के. सोवनी, दाभोळकर, हातकणंगलेकर, आळतेकर, टिळक, पिंपळगावकर, चिंचवाडकर, डी. एच्. पोवार, अष्टेकर, पंडितराव सोवनी, बगाडे, तात्या घाटगे, शिरोळकर, महेकर, खं. बागल, एस्. पी. सावंत, तंजावरराव.

उभे रांक २ : X , बाळू मर्दाने, बापू चरणकर ( का.), चुयेकर ( का.), मंडलिक ( का.), X , ललित ( का.), कृष्णा, मर्दाने, X , आबा हावलदार, X, X,

वकील मंडळी : काशीकर, सरलष्कर, धर्माधिकारी, पुराणिक, श्रेष्टी. ( का. ) म्हणजे वकिलांचे कारकून. X ही नावे कळली नाहीत.

कोल्हापूर जिल्हा न्यायालयाच्या
उज्वल परंपरेस
**आमचे विनम्र अभिवादन**

—: स त्फ ला य स ह का रि ता :—

# श्री दूधगंगा—वेदगंगा
# सहकारी साखर कारखाना
# लि., बिद्री,

[ मौनीनगर ], ता. कागल, जिल्हा कोल्हापूर.

तार : दूधसाखर, कोल्हापूर. फोन { ५७८ कोल्हापूर ऑफिस
११६६ फॅक्टरी

समाजाच्या सर्वांगीण उन्नतीस सहकार्य हा एकच मार्ग आहे.

- कृषि–औद्योगिक समाज निर्मिणेच्या कार्यात सहकारी साखर कारखाने अग्रेसर आहेत.
- सहकारी साखर कारखान्यांमुळें लहान लहान शेतकरी कारखानदार बनू लागला आहे.
- सन १९६७–६८ च्या पांचव्या गळीत हंगामात आमच्या कारखान्याने १,६४,९४८ टन ऊंसाचे गळीत करून २,००,१९७ साखर पोत्यांचे उत्पादन केले.
- साखरेचा सरासरी उतारा १२. १३.

शामराव निकम,
इन्. कार्यकारी संचालक.

शिवराम भैरू पाटील,
व्हाईस चेअरमन्.

हिंदुराव बळवंतराव पाटील,
चेअरमन्.

संदेश
आठवणी
अभीष्ट-चिंतन

## कोल्हापूरच्या न्यायालयासंबंधी विविध आठवणी

कोल्हापूरच्या न्यायालयाशी अनेक लोकांचे विविधतऱ्हेने संबंध आले. कोणी येथे वकील म्हणून आले, कोणी न्यायाधीश म्हणून आले व कोणी येथून न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्याने दुसरीकडे गेले. अशानी आपुलकीने आपल्या आठवणी लिहून पाठविल्या आहेत त्या आम्ही खाली क्रमवार नमूद करीत आहोत.

**९**

## वेदमर्हाष पं. सातवळेकर यांचेवरील खटला

(भारतास ललामभूत व शंभर वर्षे ओलांडण्याचे ज्यांना महत् भाग्य लाभले आहे अशा पद्मभूषण **पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर** यांचेवर कोल्हापूरच्या न्यायालयात राजद्रोह वगरे आरोपाबद्दल एक खटला झाला याचा उल्लेख या स्मरणिकेत पूर्वीच्या काही लेखातून झालेला आहे. 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' अशा शीर्षकाखाली पं. **सातवळेकरानी** लेख लिहिला व तो कोल्हापुरच्या 'विश्ववृत्त' मासिकात प्रसिद्ध झाला व त्याची छपाई कोल्हापूरच्या प्रो. **अण्णासाहेब विजापूरकर** यांच्या 'श्री समर्थ प्रेस' मध्ये झाली. या लेखाने राज्यकर्ते यांचे खून करावेत असे प्रोत्साहन मिळते व राज–द्रोहहि होतो वगैरे स्वरुपाचे गंभीर आरोप होते. हा खटला प्रथमतः १९०८ साली प्रो. अण्णासाहेब विजापूरकर, प्रो. **वामन मल्हार जोशी** व आणखी काही मंडळीवर भरण्यात आला. तो चालविण्यात संस्थानी न्यायाधीशाकडून कसूर होऊ नये म्हणून न्या. मी. ए. किंकेड (त्यावेळी पुण्याचे डि. जज् पुढे हायकोर्ट जज्) यांची स्पेशल न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यामध्ये सर्वांना दीर्घ कारावासाच्या शिक्षा झाल्या.

त्यानंतर पं. **सातवळेकर** सापडले व त्यांचेवरील पुरवणी खटला सेशन्स के. नं. ३२/१९०९ ने येथील न्यायाधीश के. एन्. पंडितराव यांचेपुढे चालला व त्यांनी ता. १७।७।१९०९ रोजी महत्वपूर्ण निकाल देऊन **पं. सातवळेकर** यांना दोषमुक्त केले. त्याबद्दल न्यायाधीशाना काय स्वार्थत्याग करावा लागला याचीहि हकीगत अन्यत्र आली आहे.

पंडीतजींचा असा आमच्या न्यायालयाशी संबंध आल्याने आम्ही त्यांना पत्र पाठवून त्याबद्दलच्या आठवणी लिहून पाठविण्यास विनंती केली. साठ वर्षापूर्वीची हकीगत असूनहि व पंडीतजींचे वय शंभरावी ओलांडून पुढे गेले असताहि स्मरण ठेऊन त्यांनी स्वतःचे हस्ताक्षरात जे अत्यंत तत्परतेने लिहून पाठविले व आमच्या महोत्सवास यश चिंतिले त्याबद्दल आम्हास वाटणारी कृतज्ञता शद्बानी व्यक्त करण्यापलीकडची आहे. पंडीतजींनी जे लिहिले त्यापैकी काही थोडा भाग आम्ही खाली देत आहोत.)

**— संपादक**



**वेदमर्हाष पं. सातवळेकर**

१) "मला पकडले गुरुकुल कांगडी (जि. हरिद्वा गंगा नदीच्या पार. सरासरी १०० तरी शिपाई आले व ते हरिद्वारपासून गुरुकुल कांगडीपर्यंत पहारा करीत मला सरासरी ४ वाजता पकडले. दुसऱ्या दिवसा हरिद्वारच्या पोलीस कचेरीत ठेवले. तेथून बिजनोडच्या तुरुंगात पायात लोखंडी बेडचा घालून एक महिनाभर

२) तेथे मला ओळखण्यास कोल्हापूरहून आला. त्याने ओळखले. त्यानंतर दोन पोलिसानी मला पूरला नेले व तेथेहि तुरुंगातच ठेवले.

३) पुण्याच्या स्टेशनवर एका तरुणाचे व बरोबरच्या पोलिसांचे भांडण झाले. त्यात त्या तरुणा पोलिसाला जमिनीवर पाडले व त्याच्यावर तो तरुण तेव्हा मी त्या तरुणाला सांगितले की, मी कैदी आहे नेणारे हे पोलीस आहेत तेव्हा त्यास मारू नका. तरुण दूर झाला व तो पोलिस उभा राहीला.

४) पुण्याच्या स्टेशनवरून सदर्न मराठा आम्ही कोल्हापुरास पोहोचलो. तेथे एक महिना पोलिस ठाण्यात रहावे लागले. माझे जेवण डॉ. पं. होते ते आपल्या घरातून रोज दोनवेळा पाठवीत असत.

५) माझ्यापूर्वी १ संपादक, ३ मुद्रक, याना ४।४ वर्षांची कडक शिक्षा इंग्रज न्यायाधीशा होती. माझी केस श्रीयुत पंडितराव यांच्यासमोर इंग्रज न्यायाधीशाने संपादक, मुद्रक व प्रकाश मजुरीची शिक्षा दिली होती. **वैदिक स्वराज्य** हा मला श्री. पंडितराव न्यायाधीशानी सोडले. यामु बराच त्रास झाला हे सर्व आपणास माहित आहेच."

**— श्री. दा. सात**

२

( **Shri V. A. Naik,** a retired Judge of the Bombay High Court, now the President of the Industrial Court Bombay and a jurist writes : )

## My reminiscences in regard to my association with the Kolhapur Bar

(1) In or about August 1947 I got myself enrolled as a High Court Pleader of the Kolhapur High Court Bar. This date turned out to be of great importance in my personal career. I had not taken care to get myself enrolled as an Advocate of the Bombay High Court. In 1955 when I was holding the post of Registrar of the High Court a question was raised as to whether the post of the Registrar is a judicial service. I submitted a minute on that point to the then Chief Justice of the Bombay High Court Shri M. C. Chagla. Therein I pointed out that since I was not enrolled as an Advocate of the High Court of Bombay I would be in difficulties in case the period of holding office as the Registrar is excluded. In the course of personal discussion I mentioned the fact that I was enrolled as an High Court Pleader of the Kolhapur High Court. I referred to Article 217, Explanation B and pointed out that being an Advocate of any High Court in any area within India, as defined by the Government of India Act, 1935, amounts to sufficient qualification. Shri Chagla agreed with my view. He had noted the date of my enrollment as an High Court Pleader of the Kolhapur High Court. After completion of 10 years from that date he recommended my name for appointment as a Judge of the Bombay High Court. The view expressed by Shri Chagla was not then accepted and I had to wait till completion of ten years of judicial service which came to the fag end of 1958. It is interesting to note that recently the Supreme Court has decided that being an Advocate in any territory of India, as defined by the Government of India Act, 1935, is as good a qualification as being enrolled as an Advocate of any of the High Courts in the then British India. Although my enrollment of the Kolhapur High Court Bar did not help me personally, the event became memorable by reason of the fact that my name was recommended on that basis and was finally rejected.

(2) I argued a few appeals before Justice Madgaonkar, a retired Judge of the Bombay High Court. He was a very stern and fastidious Judge. He insisted upon a very clear and chronological statement of facts and he would make notes of the statement. He would not interfere with the Advocate till the statement of facts was complete. Thereafter he would start discussion. He was particular about the phraseology used and also about semantic accuracy. Even at the advanced age when he came to Kolhapur he had a very fine memory and used to dictate his judgments with fluency and eloquence. He cannot, however, be called a popular and likeable Judge.

(3) I had also many occasions to argue appeals before Justice H. V. Divatia, a retired Judge of the Bombay High Court. He was, in many ways, the anti-thesis of Justice Madgaonkar. He was very ameable and courteous to the members of the Bar. He presented a smiling face. His questions used to disarm even the most pugnacious Advocate.

(4) I conducted quite a number of appeals before Justice Lokur, also a retired Judge of the Bombay High Court. Juctice Lokur was a golden mean between Justice Madgaonkar and Justice Divatia. He used to study the appeal as carefully as a lawyer would do, having his own notes about the geneology, facts, etc. and also the relevant case law. He was an extremely conscientious and able Judge.

(5) The litigation in Kolhapur in those days was extremely complicated. Most of the litigation related to immoveable properties and a few to commercial matters. The position of Inam law and the Hindu law as applicable to the Kolhapur State was very much uncertain and complicated. One had to wade through a maze of Vat Hukums and Circulars which were more often than not contradictory to one another. The litigants were very good paymasters.

(6) As regards the members of the Bar I have vivid memories about Shri Tamhankar who was a leading Advocate on the appellate side in those days. I worked in a number of appeals with Shri Tamhankar. Though very much senior to me, he used to brief me, one of the reasons probably was that he could not address the Court in English. Though he was B. A., LL. B., he was not accustomed to address the Court in English. At the same time he was a very keen lawyer and he had the case law on the tips of his fingers. He could be considered to be a jurist.

(7) I need not mention the names of others with whom I had the good fortunate of associating myself in conducting appeals since all of them are living today.

● ● ●

3

(न्या. राम केशव रानडे हे पूर्वी जिल्हा न्यायाधीश होते. सेवानिवृत्तीनंतर सध्या सेल्स टॅक्स ट्रायब्युनलचे जज् आहेत. ते आपल्या आठवणी लिहितात.)

१९६१ मध्ये कोल्हापूरला जिल्हा न्यायाधीश म्हणून माझी नेमणूक झाली व १९६२ च्या डिसेंबरात कोल्हापुरहून माझी बदली झाली.

पूर्वी असे म्हणण्यात येत असे की संस्थानातले वकील ब्रिटिश मुलुखातील वकिलापेक्षा फार मागासलेले असत ह्या म्हणण्याला कोहापूरचा अपवाद करावा लागेल. न्यायाधीश म्हणून खूप ठिकाणी मी काम केले आहे. त्या अनुभवावरून असे निश्चितपणे म्हणता येईल की कोल्हापूरचे वकील इतर जिल्ह्याच्या वकिलांच्या खास बरोबरीचे आहेत.

प्लेटोने असे म्हटले आहे की– All evils of the world would cease when lawyers would become philosophers and philosophers would become lawyers. जगातील सारे अमंगल त्याचवेळी नाहीसे होईल की ज्यावेळी वकील तत्वज्ञानी होतील.

कोल्हापूरचे काही वकील उत्तम तत्वज्ञानी आहेत हे कोल्हापूरास भूषणावह आहे.

येसू ख्रिस्ताला एकदा विचारण्यात आले –

" तुमच्या साऱ्या उपदेशांचे सार काय ? "

येसूने उत्तर दिले –

" तुम्ही आपल्यावर जसे प्रेम करता तसे शेजाऱ्यावर प्रेम करा हेच माझ्या साऱ्या उपदेशांचे सार आहे. "

ह्याच चालीवर असे म्हणता येईल की –

कोर्टातील न्यायदान चांगले होण्यासाठी पुष्कळ नियम सांगितले जातात त्या सर्वांचे सार असे की –

कोर्टातील न्यायदान चांगले होण्यासाठी न्यायाधीश व वकील ह्यानी जास्तीत जास्त खटपट केली पाहिजे. ह्या बाबतीत माझा अनुभव असा आहे की –

न्यायदान चांगले होण्यासाठी कोल्हापूरचे वकील न्यायाधीशाना चांगली मदत करतात.

कोल्हापूरच्या जिल्हा न्यायालयातील नोकरवर्ग चांगला असल्यामुळे न्यायाधीशाना काम करताना बरे वाटते.

टॉलस्टॉयला जगाकडे पाहून दुःख वाटू लागले तो निराश झाला; पण ईश्वरावरील श्रद्धेने त्याचे दुःख नाहीसे झाले व जीवनामध्ये त्याला आशा वाटू लागली.

ह्याच चालीवर तज्ञ म्हणतात जगातील लोकशाहीकडे पाहून दुःख वाटू लागते व आपण निराश होतो पण न्यायदानावरील श्रद्धेने आपले दुःख नाहीसे होते व लोकशाहीबद्दल आपल्याला आशा वाटू लागते.

न्यायदानाच्या बाबतीत कोल्हापूरने चांगले काम केले आहे हे पाहून फार आनंद होतो.

मी कोल्हापुरात जिल्हा न्यायाधीश म्हणून काम करीत असताना एका समारंभप्रसंगी एक वकील म्हणाले –

" साधारणतः जिल्हा न्यायाधीशाकडे " सासूबाई " म्हणून पाहिले जाते पण आम्ही येथे येणाऱ्या जिल्हा न्यायाधीशाकडे " आई " म्हणून पाहतो आणि ह्याचमुळे आमचे संबंध चांगले असतात. "

कोल्हापूर जिल्हा न्यायालयाचा शतसांवत्सरिक महोत्सव सुरू असताना –

**कोल्हापूर जिल्हा न्यायालय न्यायदानाच्या बाबतीत उत्तरोत्तर उत्कृष्ट कामगिरी करो –**

इतकीच इच्छा !

● ● ●

४

( Shri **M. V. Paranjape** who hails from the District is a leading advocate of the Bombay High Court. He had also adorned the High Court Bench for some time. He writes : )

My contact with the Kolhapur Courts has not been as thick as my contact with the Kolhapur Bar. I will not, therefore, be able to say much about the Kolhapur Courts as such. But since the Bar is an indispensible part of our judicial system, when one is acquainted with the Bar one is necessarily acquainted with the Courts to which that Bar belongs.

My association with the members of the Kolhapur Bar dates back to the day I started my career as a lawyer. In fact I am a product of the Kolhapur Bar and I am very much proud of it. It was in April 1949 when I first visited Kolhapur as a lawyer. It was the second week of my life as a lawyer and I was in my teething troubles. Kolhapur had then recently merged into the then province of Bombay and the Kolhapur Bar and litigants were in search of some lawyers in Bombay to whom they could entrust their judicial work. Having put in only two weeks as a lawyer I could not expect that people would look to me for satisfying their requirements. But to my amazement I found that one fine morning of May 1949, Mr. Kashikar the then renouned practitioner of the Criminal Bar approached me with a big bundle of papers. He disclosed to me that it was an appeal against an order of conviction in a session's case, for the offences of dacoity and murder and he made it quite plain that he wanted me to argue the appeal myself. I was simply surprised and timidly expressed my doubt about my ability to conduct the appeal without the help of a senior. I still remember the words of advice given by Mr. Kashikar then. He said "young man, God helps them who help themselves and always catch the time by fore lock." He assured me that he was aware of my standing and would not mind even if the appeal was lost, but he warned me that he would certainly mind if the appeal was not argued by me personally. I was very curious to know why Mr. Kashikar was so kind to me. He was good enough to disclose it. He told me that this had been his own attitude to every new entrant to the Bar. He said when he entered the Bar he was similarly helped by my maternal grand-father Shri Shripad Krishna Apte who himself was a renouned lawyer in his own days, and he said that was why there was a greater reason for him to help me. That incident revealed to me the tradition of the Kolhapur Bar- : "help the junior as much as possible to put him on his legs."

In that month itself I expressed a desire to my brother to go and meet Mr. Tamhankar the vetran of the Kolhapur Bar. By that time Mr. Tamhankar was leading a life of seculusion and hardly entertained any visitors. My brother, therefore, expressed a doubt as to whether Mr. Tamhankar would take any interest in me. I still persisted and insisted upon my brother to take me to Mr. Tamhankar. It was on a Sunday morning at about 8-00 A. M. that we called upon Mr. Tamhankar. As luck would have it that day Mr. Tamhankar seemed to be in a particularly cheerful mood. I expressed to him that I was seeking his advice and blessings. He gave his blessings unreservedly but as to advice he would not give any but suggested that I should watch the performance of eminent lawyers in action.

I caught the hint and subsequently attended the court to watch the performance of Mr. Tamhankar himself. It was delight to hear Mr. Tamhankar's arguments delivered in fluent and chaste Marathi. His preparation, as was usual with him, was thorough. His narration of facts was precise. His mastery of law was patent. He was always courteous to the court and also to his adversary. He was very fair to the opponent and now in retrospect I can say that he could be a match to any leading counsel in Bombay. Undoubtedly he lent stature to the Kolhapur Bar.

Members of the Kolhapur Bar have uniformly been good to me. But I cannot refrain from making a particular mention of the name of Mr. Adke, who right from the beginning and without any reason except that I was a junior, had taken personal interest in me. He actually helped me and at times would remain present in Bombay to listen to my arguments in the cases in which he had briefed me, with the idea that he should help me in improving my performance from case to case. This he did at the cost of his engagements at Kolhapur.

I had the good fortune of being instructed by almost all members of the Kolhapur Bar and I found that every body of them was so well prepared that out of necessity I had also to be fully prepared before I could sit with them at the discussion table. It is in such discussions that nice points of law and logical arguments were supplied to me and which were passed on by me to the Bench as my arguments, to find a place in the law reports; but in fact they were thought out by the instructing lawyers.

I had also some opportunities to appear in Kolhapur Courts and I found that standards and traditions of the Kolhapur Bar have been as high and noble as those of the Bombay Bar.

● ● ●

## ५

(**श्री. नागेश सदाशिव श्रीखंडे** हे पूर्वी डिस्ट्रिक्ट जज् व सिटी सिव्हिल कोर्ट होते. सेवानिवृत्तीनंतर ते मुंबई हायकोर्टात वकिली करीत असून तेथील आघाडीच्या अॅडव्होकेटस् पैकी ते एक आहेत. श्री. नागेशरावांचे वडील बापूसाहेब श्रीखंडे (परिचय पान १२ पहा) हे येथीलच असल्याने नागेशरावाना कोल्हापूरबद्दल विशेष आत्मियता वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या आठवणी सांगताना ते म्हणतात.)

आमचे घराणे कोल्हापूरचे. माझे बालपण कोठीची शाळा व राजाराम हायस्कूलमध्ये शिकण्यात आणि बावडेकरांच्या वाड्यातील पटांगण आणि खासबाग येथे खेळण्यात गेले. तथापि वकिलीच्या धंद्याकरिता १९२७ साली बेळगावला गेलो. आणि कोल्हापूरचे आणि काही काळ कोल्हापूरच्या न्यायालयामध्ये वकिली करून चिक्कोडीला स्थायिक झालेले हुषार, पराक्रमी आणि दानशूर वकील कै. दादासाहेब राशिवडेकर यांच्या आपलेपणामुळे माझा धंदा सुरू होऊन बेताबेताने वाढू लागला. तरी पण बेळगाव येथे एकापेक्षाएक निष्णात ज्येष्ठ वकील असल्यामुळे तेथेसुद्धा मोठीमोठी कामे स्वतंत्रपणे चालविण्याची संधी १२-१५ वर्षापर्यंत मला क्वचित्च मिळाली. मग बाहेर जाण्याचा प्रश्नच नाही. अशा स्थितीत १९४२ साली मी कोल्हापूर सुप्रीम कोर्टात काम चालविण्यास उभा राहिलो हा केवळ योगायोगच.

माझे स्नेही व कोल्हापूर उच्च न्यायालयाचे प्रबंधक कै. शिरगुरकर यांचे सर्वोच्च न्यायालयामध्ये वटहुकूमासंबंधी अपील होते. त्यांचे स्थानिक वकील आजारी पडल्यामुळे त्यांना दुसरे वकील पाहिजे होते. कोल्हापूरला सर गोविंद माडगावकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली होती आणि मुंबई, पुणे, बेळगाव व सातारा येथील बडेबडे वकील त्यांचेपुढे येण्याचे घाटत होते. मी अशाच एका वकिलांचे नांव सुचवावे म्हणून कै. शिरगुरकर यांनी मला बोलाविले. त्याप्रमाणे मी कोल्हापूरला गेलो. परंतु तशी नांवे सुचविण्यापूर्वीच ते काम मीच चालवावे असे कै. शिरगुरकरांनी मला सांगितले. तौलनिक दृष्टया मी अगदीच अननुभवी आणि माझ्या ठिकाणी आत्मविश्वासाचा संपूर्ण अभाव. यामुळे सूचना ऐकून मी हतबुद्धच झालो. परंतु शेवटी कै. शिरगुरकर यांच्या आग्रहाने व भिडेने मी त्यांना रुकार दिला. एका शुभ दिवशी कै. शिरगुरकरांनी मला पूर्वेकडे तोंड करून माझ्या डोक्यावर टोपी ठेवून सनदेच्या अर्जावर माझी सही घेतली.

कै. शिरगुरकर यांचे अपील चौकशीला निघण्यापूर्वी दुसऱ्या काही पक्षकारानीहि मला वकीलपत्र दिले. कै. माडगावकर यांच्यापुढे मी चालविलेले पहिले अपील नोकरी इनाम जमिनीबद्दल होते. मी त्या कामातील तथ्ये (Facts) कायदा व मांडणी यासंबंधी जवळजवळ तीन आठवडे तयारी केली होती. माझ्यासारख्या जिल्हा कोर्टात काम करणाऱ्या लहान वकिलाला सर्वोच्च न्यायालय ही फारच उंच उडी होती. कै. माडगावकर गंभीर दिसत. ते कडक आहेत असा त्यांचा लौकिक होता. विरुद्ध बाजूला कै. दत्तोपंत बेळवी हे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध वकील आणि त्यांच्या मदतीला कोल्हापूरचे कै. कृ. अ. ताम्हणकर हे ख्यातनाम वकील होते. कोर्टाच्या हॉलमध्ये श्रोत्यांची गर्दी होती. या परिस्थितीत छाती धडधडणाऱ्या माझी अवस्था सिंहाच्या कळपात सापडलेल्या गायीसारखी झाली होती. अपेलंटची बाजू मांडण्यासाठी मी उभा राहिल्यावर थोड्याच वेळात न्यायमूर्तीनी मला काही प्रश्न विचारले. ते मला अर्धवटच समजले आणि मी घाबरून फारच जलद उत्तरे दिली. त्यावेळी न्यायमूर्तींनी आपल्या कठोर आवाजात मला खालील शब्द सुनावले " You are in the bad habit of answering questions before they are over. " त्यामूळे माझी भीति कमी व्हायच्या ऐवजी अनेकपटींनी वाढली.

परंतु सुदैवाने ती भीति फार दिवस टिकली नाही. कै. माडगांवकर यांच्यापुढे मी चालविलेले दुसरे अपील कै. डॉ. धर्माधिकारी यांचे. अंगभूत आत्मविश्वासाच्या अभावामुळे व पहिल्या अपिलातील अनुभवामुळे या अपिलातही मी भरपूर तयारी केली होती आणि माझे बोलणे सुरू झाल्यावर न्यायमूर्ति चांगले ऐकून घेत आहेत असे मला वाटू लागले. मी एक मुद्दा मांडीत असता आपल्या खणखणीत आवाजात मला " Was this question asked in the lower Court ? " हा प्रश्न विचारला. मीहि न बिचकता अर्धवट जोरातच उत्तर दिले की " Although the cross examination has run over a large number of question, this important question was not asked. ' उत्तर न्यायमूर्तींना पसंत पडले असावे असे दिसले. त्यानंतर मी त्या न्यायखात्यात अनेक अपिले चालविली पण कडक शद्बात प्रश्न ऐकण्याचा प्रसंग पुनः आला नाही.

कै. माडगांवकर यांचे विनोदप्रेमही केव्हा केव्हा प्रचितीस येत असे. वटहुकूमाना कायदा म्हणून काय स्थान आहे असा प्रश्न एकदा उत्पन्न झाला. एक वकील प्रत्येक वटहुकूम हा कायदा आहे असे आग्रहाने प्रतिपादन करीत असता एक उपमा देऊन आपल्या म्हणण्याला पुष्टी देत होते. ती अशी— ब्रिटिश हिंदुस्थानात एकादा द्वितीय वर्गाचा मुन्सफसुद्धा व्हाइसरॉयसारख्या श्रेष्ठ मुलकी अधिकाऱ्याचा हुकूम मानणार नाही. परंतु कोल्हापूर संस्थानमध्ये न्याय (Judicial) अंमलबजावणी (Executive) आणि वैधानिक (Legislative) या तीनहि विभागांचे प्रमुख महाराजच आहेत. तेव्हा ते त्रिमूर्ती दत्तात्रयासारखे असून त्यांना एका तोंडाने आज्ञा केली तर त्यांचे दुसरे डोके नकारात्मक मान हलविणार नाही. हे ऐकल्यावर न्यायमूर्ति आपल्या समोरील कागद बाजूला ठेवून मनमोकळेपणाने हंसले.

याचप्रकारचे अनेक अनुभव कै. माडगांवकरांचेबद्दल लिहिता येतील. परंतु स्थलाभावी ते करता येत नाही. त्यांची

बुद्धीमत्ता, विचाराचा स्वच्छपणा, त्या वयातहि कष्ट करण्याची इच्छा, भाषा प्रभुत्व वगैरे अनेक गुण अवर्णनीय होते. त्यांची ठराव सांगण्याची शैलीहि आल्हाददायक होती.

कोल्हापूर येथे ६-७ वर्षे चालविलेल्या कामात मला आणखी एक सांगण्यासारखा अनुभव आला आणि तो न्याय-मूर्तीबद्दल नसून त्या काळातील वकीलाबद्दल आहे. ते वकील म्हणजे कै. कृ. अ. ताम्हणकर. त्यांना मी पूर्वी ओळखत नव्हतो. पण कोल्हापुरात काही कामे चालविल्यावर ते माझ्याविरुद्ध किंवा माझेबरोबर असल्याने माझा त्यांच्याशी संबंध आला आणि ते फारच वरच्या दर्जाचे वकील आहेत असे मला आढळून आले. त्यांचे ज्ञान सखोल होते. कायद्याच्या पुस्तकांचे वाचन हाच त्यांच्या आयुष्यातील मोठा व्यासंग. ऑल इंडिया रिपोर्टरच्या अंकांचे त्यांनी भगवद्गीतेसारखे व सूक्ष्मरितीने पारायण केले होते. प्रत्येक प्रकरणातील (Case) तत्वच ते लक्षात ठेवत नव्हते तर त्यातील तथ्येही ते अभ्यासत असत. भिन्नभिन्न अधिवेदित प्रकरणातील (Reported Cases) उद्‌गार एकत्र करून त्यातून एक रचना निर्माण करण्याची त्यांची हातोटी कौतुकास्पद होती. त्यांच्याकडे आलेल्या कामातील तथ्येही ते सूक्ष्मरितीने अभ्यासीत. त्यांची तारीखवार रचना तर ते करीत असतच, परंतु त्यांचे पृथक्करणहि परिणामकारकरीतीने करीत असत. ते कोल्हापूर सोडून बाहेर गेले नाहीत. पण गेले असते तरी त्यांची छाप पडल्याशिवाय राहिली नसती.

• • •

## ६

(**श्री. वसंत शांताराम देसाई** हे सिव्हिल जज् म्हणून जेवढे माहित त्यापेक्षाहि एक नाटककार, साहित्यिक व समीक्षक या नावाने सर्वांच्या अधिक परिचयाचे आहेत. सिव्हिल जज् नात्याने त्यांची काम करण्याची पद्धत ही अत्यंत मार्मिक व वैशिष्ट्यपूर्ण होती. आमच्या अवघड-फक्कड वटहुकूमांचे आव्हान स्वीकारून त्याच्याशी पुरा मुकाबला करण्यात ते यशस्वी झाले त्याचे द्योतक म्हणजे The Kolhapur Inam Law या नावाचे छोटे पुस्तक लिहिले ते होय. श्री. वसंतराव आठवणी लिहितात की,)

कोल्हापुरांत माझे अनेक स्नेही होते. उन्हाळ्याच्या सुट्टीतला कांहीं काळ तरी त्यांच्या सहवासांत घालवावा असा माझा कित्येक वर्षांचा प्रघात होता. साहित्तिकांच्या, कला-वंतांच्या आणि रसिकांच्या सहवासांत माझा कोल्हापूरचा छोटासा मुक्काम फार आनंदांत जात असे. कोल्हापुरांत त्यावेळीं संस्थानी राजवट चालू होती. कोल्हापुरातल्या " कोर्टाची पायरी " चढण्याचा किंवा तेथील न्यायाधिशांचा आणि वकिलांचा परिचय होण्याचा संभव दिसत नव्हता. अशा स्थितीत स्वराज्य आले, कोल्हापूर संस्थानचे विलिनी-करण झाले आणि, १९५० च्या जून महिन्यांत न्यायाधीश म्हणून माझी कोल्हापुरला बदली झाल्यानंतर, मी कोल्हा-पूरच्या कोर्टाची पायरी चढलो. !

१९५० सालापूर्वी कोल्हापुरांतील वकिलांचा आणि माझा परिचय झालेला नव्हता असे विधान मी एका क्षणापूर्वी केलेले आहे. कोर्टात शपथेवर सांगितल्या जाणाऱ्या सत्याच्या स्वरुपाचे ते असल्यामुळे, संपूर्ण सत्य नाहीं ! कारण, कोल्हा-पुरांत अेकेकाळी वकिली करणाऱ्या अेका वकिलाशी माझा कित्येक वर्षांपासून निकटचा संबंध जडलेला होता. त्या वकिलाचे नांव गोविंदराव टेंबे !

कोल्हापुरांतील अेकेकाळच्या वकिलांच्या, मुखत्यार वकिलांच्या आणि न्यायदानाच्या हकीगती गोविंदरावानीं मला सांगितल्या होत्या. महाराजांकडून पक्षकारांना जामिनावर सोडविण्याची कामे गोविंदरावांनी औटघटकेची वकिली केली तेव्हा त्यांना मिळत होती. आरोपीला जामिनावर सोडण्याकरितां महाराजांकडे कोणी अर्ज केला म्हणजे " टेंब्याला वकीलपत्र द्या " असे महाराज अर्जदाराला सांगत असत. त्या जमान्यातल्या न्यायदानांत न्याय असला तरी पद्धत नव्हती आणि कायद्याच्या अभ्यासाची गरज नव्हती. राजेशाहीतील " हम करेसो कायदा " या पद्धतीवर त्यावेळी टीका होत असली तरी लोकशाहीतील बहुमताला आता तीच पद्धत मानवली आहे ! सर्वसाधारणपणे संस्थानी मुलुखांत कायद्याचे राज्य नाही आणि कायद्याचा अभ्यास नाहीं असा समज त्यावेळच्या " ब्रिटिशांचे मुलखांत " पसरलेला होता. तेव्हा " कोल्हापुरांत आतां कायद्याचे राज्य प्रस्थापित झालेले असले तरी कायद्याचा अभ्यास यथातथाच असेल " अशाच कांहींशा भावनेने मी कोल्हापूर येथील कोर्टात प्रवेश केला.

—परंतु कोल्हापुरांतील कोर्टात काम करूं लागतांच माझा गैरसमज दूर झाला ! ब्रिटिश मुलखातल्या कोर्टात ज्या पद्धतीने काम चालत होते त्याच पद्धतीनें कोल्हापूर येथील कोर्टात चालत आहे असा मला सुरवातीपासूनच अनुभव आला.

चांगल्या वकिलांमुळे चांगले न्यायाधीश निर्माण होतात आणि चांगल्या न्यायाधीशामुळे चांगले वकील निर्माण होतात. न्यायाधीशांची आणि वकिलांची कर्तव्ये न्यायदानाच्या दृष्टीने अेकमेकांना पूरक असतात. कोल्हापूर येथील संस्थानी राज-वटीत चांगले न्यायाधीश आणि चांगले वकील असतीलच ! परंतु विलिनीकरणापूर्वीसुद्धा तेथील सर्वोच्च न्यायमंदिराचे प्रमुख म्हणून मुंबई हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती, गोविंदराव माडगांवकर, यांनी प्रथम आणि नंतर न्यायमूर्ती लोकूर यांनीं काम केले होते. या दोन न्यायमूर्तींच्या अमदानीत कोल्हापूर येथील न्यायमंदिरांतील कामकाजाचा दर्जा सुधारणे अपरिहार्यच होते.

कोणत्याही वादातला मूलग्राही मुद्दा बाजूला ठेवून मिथ्या वाद करण्याची किंवा तात्रिक मुद्दे उपस्थित करून